Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal

E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

09

# डॉ.अनंत वर्टी यांच्या कथेतून येणारे वैद्यकीय व्यवसायातील विनोदानुकूल अनुभव चित्रण

**प्रा.डॉ.अरुण उत्तम पाटील**
मराठी विभाग
म. स. गा. महाविद्यालय, मालेगाव कॅम्प.

---

डॉ.अ.वा.वर्टी यांच्या विनोदी कथातून येणारे आशयविश्व हे बहुविध, बहुआयामी अशा स्वरूपाचे आहे. विनोदासाठी त्यांची प्रतिभा नाना क्षेत्रे धुंडाळते.ती कधी शैक्षणिक क्षेत्रातील अशैक्षणिक बाबींवर बोट ठेवते, कधी मंत्र्यांच्या बेगडीपणाचे चित्रण करते तर कधी लेखक कलावंतांच्या भोंगळ स्वभावाचे दर्शन घडवते.त्यांची 'कृतज्ञता' ही कथा डॉक्टरी व्यवसायातील विनोदानुकूल अनुभव चित्रण करणारी कथा अभ्यासासाठी निवडली आहे.

डॉ.अनंत वर्टी हे व्यवसायाने डॉक्टर होते.नाशिक येथील महानगरपालिकेत त्यांनी जवळजवळ वीस वर्ष वैद्यकीय अधिकारी म्हणून काम पाहिले. या दरम्यान त्यांना अनेक सुसंगत - विसंगत अनुभव आले. त्यानिमित्ताने कधी त्यांनी व्यक्तीच्या जीवनाची चिकित्सा केली; तर कधी समाज जीवनाची चिकित्सा केली. या क्षेत्रात डॉ.अनंत वर्टी यांना अनेक कथा बीजे मिळाली. वैद्यकीय व्यवसायातील अनेक भलेबुरे अनुभव त्यांनी आपल्या लेखनीतून आणले आहेत. कधी त्यातील विसंगतीच्या अनुरोधाने विनोद फुलवला आणि त्या विनोदाचे दर्शन घडवत असताना ते त्या अनुभवातील करूण्याचे 'निदान' करतात. डॉ.वर्टीना व्यक्ती जीवनाची 'नाडी' नीट सापडलेली जाणवते. त्यामुळे त्यातून ते सुंदर व नर्म विनोद खुलवतात. त्यांनी अशा वैद्यकीय व्यवसायातील अनुभव टिपणाऱ्या जवळजवळ दहा ते बारा कथा लिहिल्या असून त्यापैकी 'कृतज्ञता' ही एक कथा डॉक्टरी व्यवसायातील विनोदानुकूल अनुभव चित्रण करणारी कथा सुंदर वटलेली आहे.याशिवाय त्यांच्या अन्य काही कथांतून देखील अनुषंगाने वैद्यकीय व्यवसायातील चित्रण येते. डॉ.अनंत वर्टी यांनी डॉक्टरी व्यवसायातील जीवनातून विनोद निर्मिती कशी घडून आणली ते 'कृतज्ञता' या कथेतून पाहण्याचा प्रयत्न केला आहे.

'कृतज्ञता' ही डॉ. वर्टीची दैनंदिनीच्या स्वरूपात लिहिलेली एक उत्कृष्ट विनोदी कथा असून त्यातून निवेदक व त्याची पत्नी मालती यांच्या स्वभावावर आधारित विनोद लेखक खुलवतात. निवेदकाचा मुलगा बाळ अत्यंत आजारी स्थितीत असल्यामुळे ते डॉ. वामनरावांना पाचारण करतात. डॉ. वामनराव रात्री - बेरात्री जाऊन बाळावर उपचार करतात. बाळाला डॉक्टरांच्या उपचारामुळे आजारातून बरे वाटायला लागते. त्या दरम्यान डॉक्टरांबद्दल निवेदकाची भावना अतिशय उपकृतशील अशी असते. ते डॉक्टरांना धन्वंतरी, अश्विनीकुमार मानायला लागतात.त्यांच्या बिलासाठी निवेदक स्वतःची सारी इस्टेट विकायला तयार होतो."डॉक्टरांचे हजार रुपये बिल झालं तरी देईन. माझी सारी इस्टेट देखील त्याकरता जरूर पडल्यास विकीन. राजा हरिश्चंद्राप्रमाणे माझ्या देहाचा देखील लिलाव पुकारीन,पण डॉ. वामनरावांच्या बिलातली एक दीडकी देखील कमी करणार नाही. त्यांचे आमच्यावर इतके उपकार आहेत की, आमच्या कातडीचे जोडे करून जरी त्यांच्या पायात घातले तरी ते उपकार कधी फिटणार शक्य नाही." अशी डॉक्टरांविषयी भावना असल्यामुळे निवेदक डॉक्टरांना देवच मानतो. मात्र जसजसे बाळाला बरे वाटू लागते तसतशी ही कृतज्ञतेची भावना हळूहळू विरळ होऊ लागते व शेवटी शेवटी बाळ ठणठणीत झाल्यावर तर डॉक्टरांची नसती डोके दु:खी पाठीमागे लागल्यासारखे निवेदकाला वाटायला लागते.

डॉक्टरांच्या बिलासाठी काहीही करण्यास तयार असणारा निवेदक नंतर मात्र डॉक्टरांना टाळायला लागतो. शिवाय बील देण्याऐवजी त्याला, बाळासाठी सायकल घ्यावीशी वाटते. बाळ आजारातून उठला म्हणून पत्नीसाठी साडी व बाळासाठी आणि स्वतःसाठी कोट घ्यावासा वाटतो. तसेच सत्यनारायण देखील मोठ्या उत्साहाने करतो.इतकेच नव्हे; तर पत्नीच्या बहिणीच्या शकूच्या - लग्नानिमित्त निवेदक तिला हिऱ्याची अंगठी देखील घेतो. मात्र डॉक्टरांचे बिल त्याला द्यावेसे वाटत नाही. दर महिन्याच्या एक तारखेला येणारा डॉक्टरांचा माणूस बिल मागू लागला म्हणजे त्याला संतापजनक वाटू लागते आणि अन्य कुणी भेटले तर त्यांच्याजवळ सुरुवातीला अश्विनीकुमार वाटणाऱ्या डॉ.वामनरावांविषयी बदनामी सुरू करतो, "डॉक्टर वामनराव अगदी बेअकली गृहस्थ आहे. त्याला डॉक्टरीतलं काही समजत नाही." एवढेच नव्हे तर, 'संजीवनी' वाटणारे डॉक्टरांचे औषध कसे तर - "नुसत्या रंगीबेरंगी पाण्याच्या बाटल्या भरून दिल्या, इंजेक्शन देऊन माझ्या बाळाचे हाल केले, आणि वर आमच्याकडे व्हिजिटला आले असता चहा चापला.... डॉक्टर होण्याला तर माणूस अगदीच नालायक दिसतो. अशा डॉक्टराकडे तर प्राण गेला तरी जाऊ नये."अशी स्वभाववृत्ती लेखकांनी प्रकट केली आहे.

'कामापुरता मामा' व 'गरज सरो आणि वैद्य मरो' या म्हणीची प्रचिती येते.अशा प्रकारची स्वभाववृत्ती या कथेतून लेखक प्रकट करतात. गरज असल्यास मनुष्य अतिलीन होतो, समोरच्या विषयीची 'कृतज्ञता' प्रकट करण्यासाठी तो काहीही करण्यास तयार होतो. मात्र काम संपल्यानंतर तोच कृतघ्न होऊन त्याच्याविषयी वाईट भाव प्रकट करू लागतो. समाजातील काही विचित्र नाना स्वभाव लक्षात घेऊन डॉ.वर्टी त्यातून या कथेत विनोद निर्मिती घडून आणतात. व्यक्तीच्या विसंगत स्वभाव वृत्तीवर प्रकाश टाकतात. बाळाला आजारातून बरे

©Copyright 2024 ADRJ. All Rights Reserved 

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / Bimonthly / January- February 2025 / VOL -01 ISSUE-IV

करण्यासाठी येणाऱ्या 'कृतज्ञता' म्हणून निवेदक त्याच्या कातडीचे जोडे करून त्यांच्या पायात घालायला तयार आहे. मात्र बाळ बरा झाल्यावर तीच व्यक्ती डॉक्टरांना त्याच्या जोड्याने बडवायलाही कमी करत नाही. म्हणजे व्यक्तीचा स्वभाव कसा स्वार्थी असतो हे दाखवून लेखक त्यातून स्वभावनिष्ठ विनोद निर्माण करतात.

या कथेविषयी सौ. सुमती पंडित कुलकर्णी म्हणतात."डॉक्टरी पेशात असा अनुभव येतो की, उपचार करून घेतेवेळी डॉक्टरांविषयीची भावना देवासारखी ! व बिल दिले की, राक्षसासारखी !..... डॉक्टरविषयीची भावना अशी बदलत जाते. याचा आलेखच दैनंदिनीत काढलेला दिसतो. मनुष्य स्वभावाचा एक मासलाच या कथेद्वारे डॉ.अनंत वर्टी वाचकांपुढे ठेवतात."

संदर्भ ग्रंथ :

१) डॉ.अ.वा.वर्टी - विनोदः एक व्याख्यान
२) डॉ.अ.वा.वर्टी - कृतज्ञता
३) आचार्य अत्रे - प्रस्तावना, मुमताज
४) का.बा.मराठे - निवडक मराठी समीक्षा
५) डॉ.अ.वा.वर्टी - परिपाक भाग - १, प्रस्तावना